# राजाराम रायफल्स ही कणखर लढवय्यांची रेजिमेंट

## - ब्रिगेडियर गोविंद कलवड

**कोल्हापूर / प्रतिनिधी :**

राजाराम रायफल्स ही एकमेव युनिट अशी आहे, जी शिवाजी महाराजांसाठी लढली आणि त्यानंतर देशासाठी लढली. अतिशय विश्वासार्ह आणि कणखर लढवय्यांची रेजिमेंट म्हणून याकडे पाहिले जाते, असे प्रतिपादन ब्रिगेडियर गोविंद कलवड यांनी केले. शिवाजी विद्यापीठ व छत्रपती संभाजीराजे फौंडेशन आणि शहीद जवान स्फूर्ती केंद्र यांच्या संयुक्त विद्यमाने '७ डिसेंबर सशस्त्र सेना ध्वज दिन' या कार्यक्रमाचे आयोजन विद्यापीठाच्या राजमाता जिजाऊसाहेब बहुउद्देशीय सभागृहामध्ये करण्यात आले होते. प्रमुख पाहुणे म्हणून मराठा बटालियनचे ब्रिगेडियर गोविंद कलवड बोलत होते. कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे अध्यक्षस्थानी होते. खासदार छत्रपती संभाजीराजे यांची प्रमुख उपस्थिती होती.

कलवड म्हणाले, या रेजिमेंटमध्ये महाराष्ट्रातील सैनिक मोठ्या प्रमाणात आहेत. ज्या माता-पित्यांनी आपली मुले सैनिक म्हणून या रेजिमेंटमध्ये देशसेवा करण्यासाठी पाठवली ती खरोखरच धन्यवादास पात्र आहेत. आपल्या देशासाठी प्राणांची आहुती दिलेल्या देशभक्त सैनिकांचे स्मरण करण्यासाठी सशस्त्र सेना ध्वज दिन साजरा करण्यात येतो.




**कोल्हापूर : कार्यक्रमाचे उद्घाटन करताना मराठा बटालियनचे ब्रिगेडियर गोविंद कलवड. सोबत खा. छत्रपती संभाजीराजे, कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे.**

खा. संभाजीराजे म्हणाले, देशाच्या संरक्षणामध्ये भूदल, नौदल, वायुदलाचे सैनिक फार मोठ्या प्रमाणात बलिदान देत असतात. त्यांच्याप्रती कृतज्ञता व्यक्त करण्याची, सामाजिक जबाबदारीची जागृती विपुल प्रमाणात होणे आवश्यक आहे. समाजाने मानवतेच्या दृष्टिकोनातून आणि सामाजिक बांधिलकी म्हणून शहीद जवानांच्या कुटुंबीयांच्या मागे खंबीरपणे उभे राहिले पाहिजे. कुलगुरू डॉ. शिंदे म्हणाले, जे जवान शहीद झालेले आहेत, त्यांच्या कुटुंबीयांप्रती आत्मियता बाळगून त्यांच्या ऋणाबद्दल कृतज्ञता व्यक्त केली पाहिजे.

देशभक्तिपर गीत आणि टी. ए. बटालियन बँडच्या प्रात्यक्षिकांचे सादरीकरण करण्यात आले. कोल्हापूर, सांगली, सातारा या जिल्ह्यांतील संलग्नित महाविद्यालयांमध्ये घेण्यात आलेल्या निबंध, पथनाट्य, देशभक्तिपर गीत, चित्र रेखाटन स्पर्धेमधील स्पर्धकांना मान्यवरांच्या हस्ते प्रमाणपत्रांचे वाटप करण्यात आले. कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर यांनी स्वागत व प्रास्ताविक केले, तर शाहीर आझाद नायकवडी यांनी आभार मानले. शाहीर शहाजी माळी यांनी सूत्रसंचालन केले. एन. एस. पाटील, राष्ट्रीय सेवा योजनेचे संचालक डॉ. डी. के. गायकवाड यांच्यासह एनएसएसचे विद्यार्थी-विद्यार्थिनी आणि छत्रपती संभाजीराजे फौंडेशनचे सदस्य उपस्थित होते.

# ‘राजाराम रायफल्स’ ही लढवय्यांची रेजिमेंट

## ब्रिगेडियर कलवड; विद्यापीठात सशस्त्र सेना ध्वज दिन उत्साहात

**सकाळ वृत्तसेवा**

कोल्हापूर, ता. ७ : ‘राजाराम रायफल्स् ही एकमेव युनिट अशी आहे जी शिवाजी महाराजांसाठी लढले आणि त्यानंतर देशासाठी लढले. अतिशय विश्वासाहार्य आणि कणखर लढवय्यांची रेजिमेंट म्हणून याकडे पाहिले जाते,’ असे प्रतिपादन ब्रिगेडियर गोविंद कलवड यांनी केले. शिवाजी विद्यापीठ आणि छत्रपती संभाजीराजे फाउंडेशन आणि शहीद जवान स्फूर्ती केंद्र यांच्या संयुक्त विद्यमाने आज सशस्त्र सेना ध्वज दिन कार्यक्रमाचे आयोजन विद्यापीठाच्या राजमाता जिजाऊसाहेब बहुउद्देशीय सभागृहामध्ये करण्यात आले होते. कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे म्हणून मराठा बटालियनचे ब्रिगेडियर कलवड बोलत होते. कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे अध्यक्षस्थानी होते. या वेळी खासदार छत्रपती संभाजीराजे यांची प्रमुख उपस्थिती होती.



**कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठात शनिवारी ध्वज दिन उत्साहात झाला. या वेळी ब्रिगेडियर गोविंद कलवड यांनी रोपट्याला पाणी घालून कार्यक्रमाची सुरुवात केली. या प्रसंगी उपस्थित डॉ. डी. के. गायकवाड, डॉ. विलास नांदिवडेकर, खासदार संभाजीराजे छत्रपती, कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे.**

ब्रिगेडियर कलवड पुढे म्हणाले, ‘‘ज्या माता-पितांनी आपली मुलै सैनिक म्हणून या रेजिमेंटमध्ये देशसेवा करण्यासाठी पाठविली ती खरोखरच धन्यवादास पात्र आहेत. आपल्या देशासाठी प्राणांची आहुती दिलेल्या देशभक्त सैनिकांचे स्मरण करण्यासाठी सशस्त्र सेना ध्वज दिन साजरा करण्यात येतो.’’

खासदार छत्रपती संभाजीराजे म्हणाले, ‘‘देशाच्या संरक्षणामध्ये भूदल, नौदल, वायुदलांचे सैनिक फार मोठ्या प्रमाणात बलिदान देत असतात. त्यांच्याप्रती कृतज्ञता व्यक्त करण्याची सामाजिक जबाबदारीची जागृती विपुल प्रमाणात होणे आवश्यक आहे. समाजाने मानवतेच्या दृष्टिकोनातून आणि सामाजिक बांधीलकी म्हणून शहीद जवानांच्या कुटुंबीयांच्यामागे खंबीरपणे उभे राहिले पाहिजे.’’

कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे म्हणाले, ‘‘देशसेवा करण्यामध्ये जे जवान शहीद झालेले आहेत त्यांच्या कुटुंबीयांप्रती आत्मीयता बाळगून त्यांच्या ऋणाबद्दल कृतज्ञता व्यक्त केली पाहिजे.’’

यावेळी देशभक्तिपर गीत आणि टी. ए. बटालियन बँडच्या प्रात्यक्षिकांचे सादरीकरण झाले. कोल्हापूर, सांगली, सातारा या जिल्ह्यातील संलग्नित महाविद्यालयांमध्ये घेण्यात आलेल्या निबंध, पथनाटय, देशभक्तीपर गीत, चित्र रेखाटन स्पर्धेमधील स्पर्धकांना मान्यवरांच्या हस्ते प्रमाणपत्रांचे वाटप झाले. कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर यांनी स्वागत व प्रास्ताविक केले, तर शाहीर आझाद नायकवडी यांनी आभार मानले. शाहीर शहाजी माळी यांनी सूत्रसंचालन केले. याप्रसंगी एन. एस. पाटील, राष्ट्रीय सेवा योजनेचे संचालक डॉ. डी. के. गायकवाड यांच्यासह एनएसएसचे विद्यार्थी आणि छत्रपती संभाजीराजे फौंडेशनचे सदस्य उपस्थित होते.

# राजाराम रायफल्स कणखर लढवय्यांची रेजिमेंट

## ब्रिगेडियर गोविंद कलवड; विद्यापीठात सशस्त्र सेना ध्वज दिन




**कोल्हापूर : विद्यापीठात सशस्त्र सेना ध्वज दिन कार्यक्रमाचे झाडाच्या रोपास पाणी घालून उद्घाटन करताना ब्रिगेडियर गोविंद कलवड. सोबत कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे, खा. संभाजीराजे, डॉ. विलास नांदवडेकर, डॉ. डी. के. गायकवाड आदी. (छाया : नाज ट्रेनर)**

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

राजाराम रायफल्सचे युनिट शिवाजी महाराजांसाठी लढले, त्यानंतर देशासाठी लढले. विश्वासार्ह व कणखर लढवय्यांची रेजिमेंट म्हणून याकडे पाहिले जाते, असे प्रतिपादन ब्रिगेडियर गोविंद कलवड यांनी केले.

शिवाजी विद्यापीठ, छत्रपती संभाजीराजे फाऊंडेशन व शहीद जवान स्फूर्ती केंद्र यांच्या संयुक्त विद्यमाने सशस्त्र सेना ध्वज दिन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

खा. संभाजीराजे म्हणाले, समाजाने मानवतेच्या दृष्टिकोनातून आणि सामाजिक बांधिलकी म्हणून शहीद जवानांच्या कुटुंबीयांच्या मागे खंबीरपणे उभे राहिले पाहिजे.

अध्यक्षीय भाषणामध्ये कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे म्हणाले, देशसेवा करण्यामध्ये जे जवान शहीद झालेले आहेत, त्यांच्या कुटुंबीयांप्रती आत्मियता बाळगून त्यांच्या ऋणाबद्दल कृतज्ञता व्यक्त केली पाहिजे. देशभक्तिपर गीत व टी.ए.बटालियन बँडच्या प्रात्यक्षिकांचे सादरीकरण करण्यात आले.

कुलसचिव डॉ.विलास नांदवडेकर यांनी स्वागत केले. शाहीर शहाजी माळी यांनी सूत्रसंचलन केले. शाहीर आझाद नायकवडी यांनी आभार मानले. याप्रसंगी राष्ट्रीय सेवा योजनेचे संचालक डॉ. डी. के. गायकवाड, एन. एस. पाटील आदी उपस्थित होते.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
8 DEC 2019
तरुण भारत

# सशस्त्र सेना ध्वजदिन देशासाठी समर्पित करा

## खासदार छत्रपती संभाजीराजे यांचे आवाहन: शिवाजी विद्यापाठीत दिन साजरा

प्रतिनिधी
कोल्हापूर

देशासाठी बलिदान दिलेल्या जवानांच्या वीरमाता व त्यांच्या कुटुंबीयांना तसेच माजी जवान यांना निधी उपलब्ध करण्यासाठी सशस्त्र सेना ध्वजदिन हा देशभरात साजरा केला जातो. हा दिन देशासाठी सर्वांनी समर्पित करावा, असे प्रतिपादन खासदार छत्रपती संभाजीराजे यांनी केले.

छत्रपती संभाजीराजे फौंडेशन व शिवाजी विद्यापीठ यांच्या संयुक्त विद्यमाने शिवाजी विद्यापीठाच्या राजमाता जिजाऊसाहेब बहुउद्देशीय सभागृहात शनिवारी 'नो युवर आर्मड् फोर्सेस् सॅल्युट, सपोर्ट अॅन्ड स्टॅण्ड' या कार्यक्रमात ते बोलत होते. कार्यक्रमास कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे, बेळगावच्या मराठा लाईट इन्फन्ट्री रेजिमेंट सेंटरचे कमांडर ब्रिगेडियर गोविंद कलवड, डॉ. व्ही. डी. नांदवडेकर, माजी सैनिक लिगचे अध्यक्ष एन. एन. पाटील (सांगवडेकर) यांची प्रमुख उपस्थिती होती.

तीनही दलामधील जवानांच्या कल्याणासाठी छोटे झेंडे वाटप करून हा निधी गोळा केला जातो. ज्या जवानांनी देशासाठी बलिदान केले आहे. त्यांच्या कुटुंबीयांना तसेच माजी जवानांसाठी मदत म्हणून हा दिन साजरा केला जातो. युवकांनी देशसेवेसाठी सैन्यदलात यावे यासाठी शिवाजी विद्यापीठाकडूनही प्रयत्न व्हावा. ३६५ दिवस हा सैन्यासाठी सशस्त्रदिन म्हणून साजरा व्हावा, असे खासदार संभाजीराजे यांनी सांगितले.



कोल्हापूर : सशस्त्र सेना ध्वजदिन कार्यक्रमाचे उद्घाटन रोपट्याला पाणी घालून करताना खासदार छत्रपती संभाजीराजे. सोबत कुलगुरु डॉ. देवानंद शिंदे.

ब्रिगेडियर गोविंद कलवड यांनी सशस्त्रदिनाचे महत्व सांगून मराठा रेजिमेंटच्या शौर्याचे कौतुक करून देशाच्या सर्व रेजिमेंटमध्ये मराठा रेजिमेंटला मोठा मान असल्याचे सांगितले. सैन्य दलामध्ये महाराष्ट्राच्या विशेषत: कोल्हापूरच्या मराठा रेजिमेंटच्या जवानांनी मोठे शौर्य दाखवले आहे. युवकांनी सैन्य दलात दाखल व्हावे, असे आवाहन त्यांनी केले. शहीद जवानांच्या पाल्यासाठी शिवाजी विद्यापीठाने मोफत शिक्षण, वसतिगृह योजना सुरू केली असल्याचे कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांनी सांगितले. विविध स्पर्धामधील यशस्वी विद्यार्थ्यांना प्रमाणपत्र वितरण करण्यात आले.

### मराठा रेजिमेंटबाबत युवक अनभिज्ञ

आज अनेक युवक स्पर्धा परीक्षेचा अभ्यास करत आहेत. पण हे युवक सैन्यदलाकडे जात नाहीत. मराठा रेजिमेंट हे देशातील मानाचे रेजिमेंट आहे. स्पर्धा परीक्षा देणाऱ्या युवकांना मराठा रेजिमेंट कोठे आहे? हे माहीत नाही. या रेजिमेंटची स्थापना कोल्हापुरात झाली असून, हे बेळगावमध्ये स्थलांतर झाले आहे. स्पर्धा परीक्षा देण्याऱ्या विद्यार्थ्यांनी या रेजिमेंटला भेट द्यावी, असे आवाहन खासदार संभाजीराजे यांनी केले. कोल्हापुरात रेजिमेंटच्या हॉस्पिटलसाठी संभाजीराजे छत्रपती यांनी ५० लाखांचा निधी दिला आहे. या हॉस्पिटलचे काम जलदगतीने सुरू आहे.

पुढारी

# अडचणींवर मात करून ध्येय साध्य करा : जोगदंड

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

विद्यार्थीदशेत आर्थिक गोष्टीची अडचण न सांगता आलेल्या अडचणींवर मात करून ध्येय निश्चितीसाठी सदैव प्रयत्न करून अभ्यासाशी प्रामाणिक राहिल्यास यश मिळविणे शक्य आहे, असे प्रतिपादन औरंगाबादच्या जीएसटी विभागाचे उपायुक्त रवींद्र जोगदंड यांनी केले.

शिवाजी विद्यापीठात यूजीसी अंतर्गत सेवा पूर्व परीक्षा मार्गदर्शन केंद्र व बँक ऑफ इंडिया चेअर यांच्या संयुक्त विद्यमाने 'स्पर्धा परीक्षांना सामोरे जाताना' व 'जीएसटी' विषयावर विशेष व्याख्यान झाले. रवींद्र जोगदंड म्हणाले, विद्यार्थ्यांनी स्पर्धा परीक्षांचा अभ्यास करीत असताना वेळेचे नियोजन व अभ्यासाचे सातत्य यावर विशेष भर द्यायला पाहिजे. स्पर्धा परीक्षेतून मिळालेल्या यशाची तुलना ही तुमच्या केलेल्या कष्टाची कमाई आहे.



**कोल्हापूर : स्पर्धा परीक्षा व जीएसटी विषयावरील व्याख्यानात बोलताना रवींद्र जोगदंड.**

प्रास्ताविक बँक ऑफ इंडियाचे समन्वयक प्रा.डॉ.व्ही.बी.ककडे यांनी केले. प्रमुख पाहुण्यांचा परिचय प्रा.डॉ.पी.एस.कांबळे यांनी करून दिला. सूत्रंसचालन अमितकुमार कांबळे यांनी केले. सचिन कदम यांनी आभार मानले.

# ‘ध्येय निश्चिती करा, अभ्यासाशी प्रामाणिक राहा’

म. टा. प्रतिनिधी, कोल्हापूर



रविंद्र जोगदंड

‘विद्यार्थीदशेत आर्थिक गोष्टींची अडचण न सांगता त्यावर मात करा. ध्येय निश्चितीसाठी सदैव प्रयत्न करा आणि त्याचबरोबर अभ्यासाशी प्रामाणिक राहा,’ असे प्रतिपादन औरंगाबादचे जीएसटी उपायुक्त रविंद्र जोगदंड यांनी केले.

शिवाजी विद्यापीठाच्या अर्थशास्त्र विभागात शनिवारी यूजीसीअंतर्गत सेवा पूर्व परीक्षा मार्गदर्शन केंद्र व बँक ऑफ इंडिया अध्यासन यांच्या संयुक्त विद्यमाने व्याख्यान झाले. त्यावेळी जोगदंड बोलत होते. विद्यार्थ्यांना ‘स्पर्धा परीक्षांना सामोरे जाताना’ या विषयासह जीएसटीविषयक मार्गदर्शन करण्यात आले. त्यांनी विद्यार्थ्यांना जीएसटीसारखा क्लिष्ट विषय अतिशय ओघवत्या भाषेत सांगितला.

उपायुक्त जोगदंड म्हणाले, ‘ध्येयनिश्चितीसह अभ्यासाशी प्रामाणिक राहा. विद्यार्थ्यांनी स्पर्धा परीक्षांचा अभ्यास करताना वेळेचे नियोजन आणि अभ्यासाचे सातत्य यावर विशेष भर द्यायला पाहिजे. तरच यश तुमच्याकडे आपोआप चालत येईल. स्पर्धा परीक्षेतून मिळालेल्या यशाची तुलना ही तुमच्या केलेल्या कष्टाची कमाई आहे. तेव्हाच तुम्ही खऱ्या अर्थाने समाजाची सेवा करू शकता. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची वृत्ती तुम्ही अंगिकारली पाहिजे. स्पर्धा परीक्षार्थींनी खचून न जाता अत्यंत चिकाटीने प्रयत्नशील रहावे. व्याख्यानाच्या समारोपावेळी जोगदंड यांनी प्रश्नोत्तरांच्या स्वरुपात विद्यार्थ्यांच्या शंकाचे निरसनही केले. ‘कोल्हापूरच्या मातीने अधिकारी म्हणून घडविले याचा सार्थ अभिमान आहे’ असेही ते स्वतःच्या प्रवासाविषयी बोलताना म्हणाले.

बँक ऑफ इंडिया अध्यासनाचे समन्वयक प्रा. डॉ. व्ही. बी. ककडे यांनी कार्यक्रमाचे प्रास्ताविक केले. सेवापूर्व परीक्षा मार्गदर्शन केंद्राचे समन्वयक प्रा. डॉ. पी. एस. कांबळे यांनी प्रमुख पाहुण्यांचा परिचय करून दिला. अमितकुमार कांबळे यांनी सूत्रसंचालन केले. सचिन कदम यांनी आभार मानले.


# विद्यापीठात मंगळवारपासून आंतरराष्ट्रीय परिषद

## कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे; सुवर्ण महोत्सवाचे औचित्य, जगभरातील मान्यवरांची उपस्थिती

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

शिवाजी विद्यापीठ समाजशास्त्र विभागातर्फे विभागाच्या सुवर्णमहोत्सव वर्षाचे औचित्य साधून दि. १० ते १२ डिसेंबर या कालावधीत आंतरराष्ट्रीय परिषदेचे आयोजन करण्यात आले आहे. विद्यापीठाच्या राजर्षी शाहू सिनेट हॉलमध्ये मंगळवारी सकाळी १०.३० वाजता परिषदेचे उद्घाटन होणार आहे, अशी माहिती कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांनी पत्रकार परिषदेत दिली.

कुलगुरू डॉ. शिंदे म्हणाले, 'समाज : पुनर्रचना, प्रतिक्रिया आणि जबाबदारी' या मध्यवर्ती विषयावर ही परिषद होत आहे. परिषदेचे उद्घाटन ज्येष्ठ संशोधक व मानवी हक्क कार्यकर्त्या प्रा. गेल ऑम्वेट यांच्या हस्ते होणार आहे. विद्यापीठ अनुदान आयोग व भारतीय सामाजिक शास्त्रे संशोधन संस्थेचे माजी अध्यक्ष डॉ. सुखदेव थोरात



शिवाजी विद्यापीठातून...

यांचे बीजभाषण होणार आहे. अध्यक्षस्थानी कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे असतील. परिषदेचे संचालक प्रा. जगन कराडे असणार आहेत.

सोहळ्यासाठी ज्येष्ठ संशोधक डॉ. उत्तमराव भोईटे, कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर, भारतीय समाजशास्त्र परिषदेच्या अध्यक्षा प्रा. आर. इंदिरा, सचिव डी. आर. साहू, सामाजिकशास्त्र विभागाच्या अधिष्ठाता प्रा. भारती पाटील, शास्त्र विभागाचे अधिष्ठाता प्रा. पी. एस. पाटील प्रमुख उपस्थित राहणार आहेत. 'प्रा. डॉ. विलास संगवे स्मृती व्याख्यान', भारतीय समाजशास्त्राच्या अध्ययन आणि अध्यापनास यावर्षी शंभर वर्षे पूर्ण होत असल्याच्या पार्श्वभूमीवर भारतीय समाजशास्त्राचा शंभर वर्षांचा प्रवास, यावर विशेष व्याख्याने व परिषदेस काही कारणांनी ज्यांना उपस्थित राहता येत नाही, अशांसाठी विद्यापीठात पहिल्यांदाच ई-सेशनही होणार असून यात परदेशी विद्वान सहभागी होणार आहेत.

परिषदेचा समारोप दि. १२ रोजी सायंकाळी ५ वाजता होणार आहे. बिहारमधील मोतिहार येथील महात्मा गांधी केंद्रीय विद्यापीठाचे माजी कुलगुरू प्रा. अरविंद अग्रवाल हे प्रमुख पाहुणे असणार आहेत. अध्यक्षस्थानी प्र. कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के असतील. यावेळी डॉ. पी. डी. राऊत, प्रा. ए. एम. गुरव उपस्थित असणार आहेत. पत्रकार परिषदेला प्र. कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, कुलसचिव डॉ. व्ही. डी. नांदवडेकर उपस्थित होते.

### परिषदेला १५ देशांतील ७० विद्वानांची उपस्थिती

आंतरराष्ट्रीय परिषद रशियन सोसायटी ऑफ सोशिओलॉजिस्ट, ब्रीक्स नेटवर्क्स ऑफ सोशिओलॉजी, एशियन क्लायमेंट जेंच एज्युकेशन सेंटर, साऊथ कोरिया व इंडियन सोशिओलॉजिकल सोसायटी यांच्या सहभागाने होत आहे. १५ ते १६ देशांतील मान्यवर विचार मांडणार आहेत. तीन दिवसांत १८ सत्रांत १५ देशांतील ७० विद्वान, विविध विद्यापीठांचे ८ माजी कुलगुरू सहभागी होणार आहेत. परिषदेत ९० पेक्षा अधिक शोधनिबंधांचे सादरीकरण होणार आहे, असे समाजशास्त्र विभागाचे प्रमुख प्रा. जगन कराडे यांनी सांगितले.

# विद्यापीठात समाजशास्त्र विषयाची आंतरराष्ट्रीय परिषद

## देशविदेशातील समाजशास्त्रज्ञ, नऊ कुलगुरूही उपस्थित राहणार

**सकाळ वृत्तसेवा**

कोल्हापूर, ता. ७ : शिवाजी विद्यापीठाच्या समाजशास्त्र विभागाने यंदा सुवर्णमहोत्सवी वर्षात पदार्पण केले आहे. यानिमित्ताने विद्यापीठात 'समाज : पुनर्रचना, प्रतिक्रिया आणि जबाबदारी' या विषयावर आंतरराष्ट्रीय परिषद होणार आहे. १० ते १२ डिसेंबर या कालावधीत होणाऱ्या या परिषदेचे उद्घाटन ज्येष्ठ समाजशास्त्रज्ञ गेल ऑम्वेट यांच्या हस्ते होणार आहे.

परिषदेमध्ये देशविदेशातील अभ्यासक आपले प्रबंध सादर करणार आहेत, अशी माहिती शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांनी आज पत्रकार परिषदेत दिली.

पत्रकार परिषदेमध्ये समाजशास्त्र विभागाचे प्रमुख डॉ. जगन कराडे यांनी या परिषदेमागील भूमिका, याची वैशिष्ट्ये आणि विषयाचे महत्त्व याबाबत माहिती दिली.

यावेळी कुलगुरू डॉ. शिंदे म्हणाले, ''रशियन सोसायटी ऑफ सोशिओलॉजिस्ट, साऊथ आफ्रिकन सोशिओलॉजिकल असोसिएशन, इंटरनॅशनल सोशिओलॉजिकल असोसिएशन, ब्रीक्स नेटवर्क्स ऑफ सोशिओलॉजी, एशियन क्लायमेट चेंज एज्युकेशन सेंटर, साऊथ कोरिया आणि इंडियन सोशिओलॉजिकल सोसायटी या आंतरराष्ट्रीय संस्थांच्या सहभागाने ही परिषद होत आहे. तीन दिवसांत सत्रांमध्ये होणाऱ्या परिषदेत माजी कुलगुरू प्रा. डॉ. विद्युत जोशी, हेमिक्सा राव, हरी बाबू, के. एल. शर्मा, जोगन शंकर, बी. सी. बारिक, अरविंद अग्रवाल आणि समिता मन्ना यांचा समावेश आहे.''

परिषदेचा समारोप १२ डिसेंबरला सायंकाळी ५ वाजता बिहारमधील मोतिहारी येथील महात्मा गांधी केंद्रीय विद्यापीठाचे माजी कुलगुरू प्रा. अरविंद अग्रवाल यांच्या उपस्थितीत होणार आहे. भारतीय सामाजिक शास्त्रे संशोधन संस्थेचे (आयसीएसएसआर) संचालक प्रा. उपेंद्र चौधरी, प्रा. अजय गुप्ता हे उपस्थित राहणार आहेत. या पत्रकार परिषदेस प्र-कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर आदी उपस्थित होते.

# उद्योग निर्मितीत महिलांचा पुढाकार महत्त्वाचा

## - प्रा. ए. एम. गुरव

**कोल्हापूर / प्रतिनिधी :**

उद्योग, व्यवसाय निर्मितीमध्ये महिलांचा पुढाकार महत्त्वाचा आहे. याबाबत योग्य मार्गदर्शन आणि नवीन उद्योजक निर्माण होण्याच्या हेतूने बदलत्या परस्थितीमध्ये बाजारपेठेची मागणी, ग्राहकांची पसंती आदी बाबींचा विचार करून व्यवसायाची सुरुवात केल्यास निश्चितच फायदा होईल, असे मत शिवाजी विद्यापीठ कौशल्य उद्योजक विकास केंद्र समन्वयक डॉ. प्रा. ए. एम. गुरव यांनी व्यक्त केले.

शिवाजी विद्यापीठ व चंद्रप्रभा शंकरराव पाटील महिला वाचनालय यांच्या संयुक्त विद्यमाने वडणगे, ता. करवीर येथे महिला बचत गट उद्योग मार्गदर्शन शिबिर उत्साहात पार पडले, यावेळी गुरव बोलत होते. अध्यक्षस्थानी



**वडणगे : महिलांना मार्गदर्शन करताना डॉ. प्रा. ए. एम. गुरव.**

सरपंच सचिन चौगले होते.

महिलांना स्वावलंबी बनण्यासाठी नवीन लघु, कुटीर उद्योगासाठी प्रोत्साहन देण्यासाठी डॉ. प्रा. ए. एम. गुरव, विकास अधिकारी महेश चव्हाण, बांगलादेश संशोधक लिटॉन पी. यांचे मार्गदशन लाभले. लिटॉन यांनी बचत गट आणि उद्योग ही संकल्पना कशी बांगलादेश येथून उदयास आली, हे सांगून त्यातील यशस्वितेबद्दल माहिती दिली. वैशाली पाटील, दिलीप शेलार यांच्यासह मान्यवर उपस्थित होते. सूत्रसंचालन डॉ. प्रा. अपर्णा पाटील यांनी केले.



वडणगे : येथील महिलांसाठी आयोजित एकदिवसीय कौशल्य प्रशिक्षण कार्यशाळेत मार्गदर्शन करताना डॉ. ए. एम. गुरव. समोर उपस्थित महिला.

# उद्योग, व्यवसाय निर्मितीमध्ये महिलांचा पुढाकार महत्त्वाचा

## डॉ. ए. एम. गुरव; महिलांसाठी कौशल्य प्रकार्यशाळा

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

उद्योग, व्यवसाय निर्मितीमध्ये महिलांचा पुढाकार महत्त्वाचा आहे, असे प्रतिपादन शिवाजी विद्यापीठाच्या कौशल्य व उद्योजकता विकास केंद्राचे संचालक डॉ. ए. एम. गुरव यांनी केले.

विद्यापीठाच्या वतीने वडणगे (ता. करवीर) येथील महिलांसाठी आयोजित एकदिवसीय कौशल्य प्रशिक्षण कार्यशाळेत ते बोलत होते. ते म्हणाले, आजच्या बदलत्या परिस्थितीत बाजारपेठेची मागणी, ग्राहकांची पसंती या गोष्टींचा विचार करून व्यवसाय सुरू केल्यास निश्चित फायदा होईल. याप्रसंगी डॉ. एस. डी. कोरे यांनी 'कौशल्ये विकासाची गरज' याविषयावर मार्गदर्शन केले.

बांग्लादेशातील संशोधक लिटॉन महिला बचत गटाच्या यशस्वीतेबाबत विचार मांडले. कार्यशाळेत ग्रामीण महिलांचे सशक्तीकरण, साधन सामग्रीचे व्यवस्थापन, कृषी प्रक्रिया युनिट, उत्पादित मालाचे पॅकिंग, नेटवर्किंग, अकौंटिंग याबाबतचे मार्गदर्शन करण्यात आले.

यावेळी सरपंच सचिन पाटील, वैशाली पाटील, पार्वती शेलार आदी उपस्थित होते. कौशल्य विकास अधिकारी महेश चव्हाण यांनी आभार मानले.

# शिवाजी विद्यापीठाचा एकतर्फी विजय

## भोपाळ येथे पश्चिम विभागीय आंतरविद्यापीठ पुरुष फुटबॉल स्पर्धा

**सकाळ वृत्तसेवा**

कोल्हापूर, ता. ७ : पश्चिम विभागीय पुरुष फुटबॉल स्पर्धेत आज (ता. ७) झालेल्या सामन्यात शिवाजी विद्यापीठ संघाने सागर (मध्यप्रदेश) येथील डॉ. एच. एस. गौर विद्यापीठाचा ४ विरूद्ध एका गोलने पराभव केला. या स्पर्धा बरकत उल्लाह विद्यापीठ, भोपाळ (मध्यप्रदेश) येथे सुरू आहेत. शिवाजी विद्यापीठाचा हा स्पर्धेतील चौथा विजय असून सोमवारी शिवाजी विद्यापीठाची लढत तुल्यबळ गोवा विद्यापीठाशी होणार आहे.

या सामन्यातील विजेता संघ



जालंधर येथे होणाऱ्या अखिल भारतीय आंतरविद्यापीठ स्पर्धेसाठी पात्र ठरणार आहे.

आज दुपारच्या सत्रात झालेल्या सामन्यात शिवाजी संघाच्या गोलकीपर व बचावफळी यांच्यातील समन्वयाच्या आभावामुळे सामन्याच्या दुसऱ्याच मिनिटाला डॉ. गौर विद्यापीठाने पहिल्या गोलची नोंद केली. त्यानंतर मात्र पिछाडीवर पडलेल्या शिवाजी संघाच्या खेळाडूंनी शॉर्ट पासिंगच्या सहाय्याने डॉ. गौर संघावर सातत्याने हल्ले चढवले. याचाच परीणाम म्हणजे १९ व्या व २० व्या मिनिटाला शिवाजी विद्यापीठाकडून सलग २ गोल अनुक्रमे राहुल पाटीलच्या पासवर प्रतीक बदामे याने व दिग्विजय सुतारच्या पासवर सुयश हांडे याने नोंदवले. मध्यंतरापर्यंत शिवाजी विद्यापीठाची २ विरूद्ध १ अशी आघाडी कायम राहिली.

उत्तरार्धात अधिक सूत्रबद्ध खेळ करत शिवाजी विद्यापीठाच्या दिग्विजय सुतारने सामन्याच्या ४२ व्या मिनिटाला डावीकडून अप्रतिम गोल करुन संघाला ३ विरूद्ध १ अशी आघाडी मिळवून दिली. सामना संपण्यास १५ मिनिटे बाकी असताना बदली खेळाडू म्हणून मैदानात उतरलेल्या रोहित पोवार याने ६८ व्या मिनिटाला चौथ्या गोलची नोंद केली आणि ४ विरूद्ध १ याच गोलफरकावर शिवाजी विद्यापीठाने एकतर्फी विजय मिळवला.